**अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर**

**नगरसचिव विभाग**

**मा.प्रशासक यांजकडील मा. स्थायी समिती विषयांबाबतचे निर्णय**

**कार्यसूची क्रमांक -३२**

मा.प्रशासक ठराव क्र. ३८१ | विषय क्रमांक- ३८१

दिनांक- २१/०१/२०२५ | विभाग - प्रभाग समिती क्र.२

---

**विषय :-** अहिल्यानगर महानगरपालिका प्रभाग समिती क्र.२ प्रभाग क्र. ९ मधील बील नं. Z२९०८३२२६ ची पाणी पट्टी बील निर्लेखित करणे बाबत

**ठराव :-** विभागाने प्रस्तावित केल्यानुसार अर्जदार यांनी दाखल केलेल्या अर्जानुसार वसुली अभिलेखा पडताळणी केली असता वॉर्ड क्र. ९ बिल क्र. Z२९०८३२२६ (९/३३९) नांव - श्री गणेश लक्ष्मणराव देशमुख, पांडुरंग कुकडवाल ५७५८ धनगरगल्ली ,अहिल्यानगर या नांवे व बिल क्रमांक Z२९००००४६ नांव-गणेश लक्ष्मणराव देशमुख या नांवे सेपरेट नळ कनेक्शनची नोंद आढळून येत आहे. अर्जदार यांनी दाखल केलेल्या अर्जानुसार प्रभाग समिती क्र. २ पाणी पुरवठा फिटर, हेड फिटर यांनी दि.१५/०२/२०२४ रोजी सक्षम स्थळ पाहणी केली असता सदर ठिकाणी एक नळ कनेक्शन असल्याचे आढळून येत आहे. असा रिपोर्ट दिलेला आहे. तसेच सदर मालमत्तेमध्ये पूर्वीपासून बिल क्रमांक Z२९००००४६ नांव -गणेश लक्ष्मणराव देशमुख या नांवे नळ कनेक्शन वेगळे बील येत होते. परंतु सन २०२०-२०२१ मध्ये सदरचे नळ कनेक्शन Z२९०८३२२६ (९/३३९) नांव -गणेश लक्ष्मणराव देशमुख, पांडुरंग कुकडवाल ५७५८ धनगर गल्ली या घरपट्टी बिलामध्ये समाविष्ट करण्यात आलेले असून सन २०२०-२०२१ मध्ये सेपरेट नळ कनेक्शन बिल क्रमांक Z२९००००४६ नांव -गणेश लक्ष्मणराव देशमुख या नांवे बिल रद्द करण्यात आलेले नसल्याने सन २०२०-२०२१ अखेर पाणीपट्टी रक्कम रू ७,५००/- व शास्ती रक्कम रू.२९५३/- असे एकूण रक्कम १०,४५३/- कराची रकमेसह संपुर्ण निर्लेखित करणेस मा.प्रशासक यांची मंजुरी देणेत येत आहे.

---

**निर्णय:-** महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग,शासन आदेश क्रमांकः एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.२८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

सही/-
**(मेहेर लहारे)**
प्र.नगरसचिव
अहिल्यानगर महानगरपालिका,

सही/-
**(यशवंत डांगे)**
मा.प्रशासक,
अहिल्यानगर महानगरपालिका

# अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर
## नगरसचिव विभाग
## मा.प्रशासक यांजकडील मा. स्थायी समिती विषयांबाबतचे निर्णय

**कार्यसूची क्रमांक -३२**

मा.प्रशासक ठराव क्र. ३८२ — विषय क्रमांक- ३८२
दिनांक- २१/०१/२०२५ — विभाग - पाणी पुरवठा विभाग

---

**विषय :-** अहिल्यानगर महानगरपालिका पाणी पुरवठा विभागाकरिता अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील ) व (मेकॅनिकल ) यापदी अटी व शर्तीनुसार करारबध्द नियुक्ती करिता दरमहा मानधन वाढविणे बाबत

**ठराव :-** विभागाने प्रस्तावित केल्यानुसार, पाणी पुरवठा विभागाकरिता करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) व कनिष्ठ अभियंता (मेकॅनिकल) यापदी मानधनावर खालील प्रमाणे नमुद केल्यानुसार नियुक्ती करण्यांत आलेली आहे.

| अ.नं. | नांव | जा.क्र. आस्था. व दि. | नियुक्ती कालावधी | दरमहा मानधन |
|---|---|---|---|---|
| १ | राहुल सदाशिव ढगे | २४५१/ २२/८/२०२४ | दि.१०/०४/२०२४ पासून ६ महिन्याकरिता | २५,०००/- |
| २ | प्रदिप सदाशिव ढगे | २४५१/ २२/८/२०२४ | दि.१०/०४/२०२४ पासून ६ महिन्याकरिता | २५,०००/- |
| ३ | स्नेहल राजेंद्र मुळे | २४५२/ २२/८/२०२४ | दि.२६/०३/२०२४ पासून ६ महिन्याकरिता | २५,०००/- |

सद्यस्थितीमध्ये अहिल्यानगर महानगरपालिकेच्या अत्यावश्यक सेवेचा विचार करून आस्थापना विभागामार्फत पाणी पुरवठा विभागाकरिता तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) व कनिष्ठ अभियंता (मेकॅनिकल) यापदी तांत्रिक खंड देवून वरील संबंधीतांची अटी व शर्तीनुसार दरमहा मानधनावर सहा-सहा महिन्याकरिता नियुक्ती बाबतची कार्यवाही ही मा.स्थायी समितीच्या पुर्व मान्यतेनुसार करण्यात येत आहे.

पाणी पुरवठा विभागाकरिता तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) व कनिष्ठ अभियंता (मेकॅनिकल ) यापदी नियुक्तीने मानधनामध्ये वाढ करणे बाबतचा प्रस्ताव यापूर्वी मा.स्थायी समिती ठराव क्र.५२ दि. २९/१२/२०१७ अन्वयेच्या मान्यता पारीत ठरावानुसार मानधनामध्ये वाढ करून दरमहा मानधन रू. २०,०००/- वरून रू. २५,०००/- इतके करण्यात आलेले आहे.

संदर्भिय विनंती अर्जाच्या अनुषंगाने दरमहा मानधनवाढी बाबतचा तपशिल खालील प्रमाणे दर्शविण्यात येत आहे.

| अ.नं. | तात्पुरत्या स्वरूपात पदनाम | विभागाचे नांव | सध्याचे देण्यात येणारे दरमहा मानधन रू. | १० टक्के प्रमाणे प्रस्तावित मानधनवाढ दरमहा एकूण मानधन रू. |
|---|---|---|---|---|
| १ | कनिष्ठ अभियंता (सिव्हील ) व (मेकॅ.) | पाणी पुरवठा विभाग | २५,०००/- | २७,५००/- |

तरी वरील संदर्भिय अर्जाच्या अनुषंगाने पाणी पुरवठा विभागाकरिता अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात नियुक्ती कनिष्ठ अभियंता (सिव्हील ) व (मेकॅनिकल) यांचे दरमहाच्या मानधनामध्ये १० % प्रमाणे वाढ करणेस मा.प्रशासक यांची मंजुरी देणेत येत आहे.

---

**निर्णयः-** महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग,शासन आदेश क्रमांकः एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.२८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

सही/-
**(मेहेर लहारे)**
प्र.नगरसचिव
अहिल्यानगर महानगरपालिका,

सही/-
**(यशवंत डांगे)**
मा.प्रशासक,
अहिल्यानगर महानगरपालिका

**अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर**
**नगरसचिव विभाग**
**मा.प्रशासक यांजकडील मा. स्थायी समिती विषयांबाबतचे निर्णय**

**कार्यसूची क्रमांक -३२**

मा.प्रशासक ठराव क्र. ३८३ विषय क्रमांक- ३८३
दिनांक- २१/०१/२०२५ विभाग - आस्थापना विभाग

---

**विषय :-** अहिल्यानगर महानगरपालिका विद्युत विभागाकरिता अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वायरमन यापदी अटी व शर्ती नुसार करारबध्द नियुक्ती करिता दरमहा मानधन वाढविणे बाबत

**ठराव :-** विभागाने प्रस्तावित केल्यानुसार अहिल्यानगर महानगरपालिकेमधील इलेक्ट्रीक विभागाकरिता तात्पुरत्या स्वरूपात वायरमन यापदी मानधनावर खालील प्रमाणे नमुद केलेनुसार संबंधीतांची नियुक्ती केलेली असून त्याबाबतची माहिती पुढील प्रमाणे

| अ.नं. | नांव | जा.क्र. आस्था. व दि. | नियुक्ती कालावधी | दरमहा मानधन |
|---|---|---|---|---|
| १ | सुभाष बापुराव सुळ | जा.क्र.२९८१ दि.३०/०९/२०२४ | १८/०६/२०२४ ते १७/१२/२०२४ | १४,२५०/- |
| २ | लोंढे नवनाथ बाळासाहेब | जा.क्र.२९८१ दि.३०/०९/२०२४ | १८/०६/२०२४ ते १७/१२/२०२४ | १४,२५०/ |
| ३ | काटकर लंकेश तुकाराम | जा.क्र.२९८१ दि.३०/०९/२०२४ | १८/०६/२०२४ ते १७/१२/२०२४ | १४,२५०/ |
| ४ | डहाळे सौरभ भाउसाहेब | जा.क्र.२९८१ दि.३०/०९/२०२४ | १८/०६/२०२४ ते १७/१२/२०२४ | १४,२५०/ |
| ५ | अंकित किशोर कासवा | जा.क्र.२९८१ दि.३०/०९/२०२४ | १८/०६/२०२४ ते १७/१२/२०२४ | १४,२५०/ |
| ६ | जावळे अनिल श्रीरंग | जा.क्र.२९८१ दि.३०/०९/२०२४ | १८/०६/२०२४ ते १७/१२/२०२४ | १४,२५०/ |
| ७ | शिंदे महेश अर्जुन | जा.क्र.२९८१ दि.३०/०९/२०२४ | १८/०६/२०२४ ते १७/१२/२०२४ | १४,२५०/ |
| ८ | खान शादाब रफिक | जा.क्र.२९८० दि.३०/०९/२०२४ | ०७/०६/२०२४ ते ०६/१२/२०२४ | १४,२५०/ |
| ९ | सय्यद इकबाल सुलेमान | जा.क्र.२४५३ दि.२५/०८/२०२४ | २७/०४/२०२४ ते २६/१०/२०२४ | १४,२५०/- |

वरिल संबंधितांची सद्यस्थितीमध्ये अहिल्यानगर महानगरपालिकेमध्ये इलेक्ट्रीक विभागाकरिता अत्यावश्यक सेवेसाठी तात्पुरत्या स्वरूपात वायरमन यापदी वेळोवेळी तांत्रिक खंड देवून दरमहा मानधनावर सहा-सहा महिन्याकरिता पुर्ननियुक्ती बाबतची कार्यवाही ही मा.स्थायी समितीच्या पुर्व मान्यतेने करण्यात येत आहे.

इलेक्ट्रीक विभागाकरिता तात्पुरत्या स्वरूपात वायरमन यापदी नियुक्तीचे मानधनामध्ये वाढ करणेबाबतचा प्रस्ताव यापूर्वी मा.स्थायी समितीकडे निर्णयाकरिता पाठविण्यात आलेला होता. त्यानुषंगाने मा.स्थायी समिती ठराव क्र. ३५ दिनांक २७/०६/२०१९ अन्वयेच्या पुर्व मान्यता पारित ठरावानुसार मानधनामध्ये वाढ करून दरमहा मानधन रू. ९,५००/- वरून १४,२५०/- इतके करण्यात आलेले होते.

संदर्भिय विनंती अर्जाच्या अनुषंगाने दरमहा मानधनवाढी बाबतचा तपशिल खालील प्रमाणे दर्शविण्यांत येत आहे.

| अ.नं. | तात्पुरत्या स्वरूपात पदनाम | विभागाचे नांव | सध्याचे देण्यात येणारे दरमहा मानधन रू. | १० टक्के प्रमाणे प्रस्तावित मानधनवाढ दरमहा एकूण मानधन रू. |
|---|---|---|---|---|
| १ | वायरमन | इलेक्ट्रीक विभाग | १४,२५०/- | १५,६७५/- |

.. २

तरी वरिल प्रस्तावाच्या अनुषंगाने इलेक्ट्रीक विभागाकरिता अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वायरमन यापदाचे नियुक्तीमधील दरमहाच्या मानधनामध्ये १०% प्रमाणे वाढ करणेस मा.प्रशासक यांची मंजुरी देणेत येत आहे.

---

**निर्णयः-** महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग,शासन आदेश क्रमांकः एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.२८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

सही/-
**(मेहेर लहारे)**
प्र.नगरसचिव
अहिल्यानगर महानगरपालिका,

सही/-
**(यशवंत डांगे)**
मा.प्रशासक,
अहिल्यानगर महानगरपालिका

**अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर**
**नगरसचिव विभाग**
**मा.प्रशासक यांजकडील मा. स्थायी समिती विषयांबाबतचे निर्णय**

**कार्यसूची क्रमांक -३२**

मा.प्रशासक ठराव क्र. ३८४ | विषय क्रमांक- ३८४
दिनांक- २१/०१/२०२५ | विभाग - प्रभाग समिती क्र.३

---

**विषय :-** अहिल्यानगर महानगरपालिका प्रभाग समिती क्र. ३ मालमत्ता क्रमांक Z३८६०९७९०२ अर्जदार शेख अशर एजाज यांना मालमत्तावर आकारण्यात आलेली नळपाणीपट्टी निर्लेखित करणे बाबत

**ठराव :-** विभागाने प्रस्तावित केल्यानुसार अर्जदार शेख अशर एजाज वारसदार (स्वर्गवासी एजाज अब्दुल हक रा. गोविंदपूरा मुकुंदनगर यांचे मालमत्ता क्र. Z३८६०९७९०२ ) वर सन २०२४-२०२५ ची आकारणी करण्यात आलेली नळपट्टी रद्द करणेकरिता मागणी सदर अर्जदार यांनी संदर्भ क्र. १ अन्वये इकडेस केलेली आहे.

त्या अनुषंगाने पाणी पुरवठा फिटर यांचे प्र.स.क्र. ३ आ.क्र. ०१३७२२ दि. १८-१२-२०२४ रोजी प्रत्यक्ष स्थळपाहणी अहवाल मध्ये सदर मालमत्ता ावर नळकनेक्शन नसलेची आढळून आले आहे. याबाबत प्रस्तावास मा.उपायुक्त मुल्यनिर्धारण कर संकलन अधिकारी व मा.आयुक्त साहेब यांची नस्ती आ.क्र.४६८८ दि.०९-०१-२०२५ रोजी प्रस्तावास मंजूरी घेतलेली आहे.

तरी अर्जदार श्री शेख अशर अजाज यांना मालमत्तावर आकारण्यात सन २०१२-२०१३ पासून सन २०२४-२०२५ अखेर १५,०००/- रूपये आकारण्यात आलेली नळपाणीपट्टी निर्लेखित करणेस मा.प्रशासक यांची मंजुरी देणेत येत आहे.

---

**निर्णयः-** महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग,शासन आदेश क्रमांकः एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.२८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

सही/-
**(मेहेर लहारे)**
प्र.नगरसचिव
अहिल्यानगर महानगरपालिका,

सही/-
**(यशवंत डांगे)**
मा.प्रशासक,
अहिल्यानगर महानगरपालिका

# अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर
## नगरसचिव विभाग
## मा.प्रशासक यांजकडील मा. स्थायी समिती विषयांबाबतचे निर्णय

**कार्यसूची क्रमांक -३२**

मा.प्रशासक ठराव क्र. ३८५ विषय क्रमांक- ३८५

दिनांक- २१/०१/२०२५ विभाग - सार्व. बांधकाम विभाग

---

**विषय :-** इमारत दुरूस्ती अंतर्गत ई नि.क्र. १११०७४९-१ च्या मंजूरी बाबत अहिल्यानगर महानगरपालिकेच्या नगररचना विभागास अभिलेख ठेवण्यासाठी नगररचना ऑफिस शेजारी रूम बांधणे बाबत

**ठराव :-** विभागाने प्रस्तावित केल्यानुसार उपरोक्त विषयान्वये खालीलप्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे.

१.प्रशासकिय मान्यता :- मा.आयुक्त यांची दि.०४/१०/२०२४ रोजीची मान्यता

२.निविदा विक्री कालावधी :- दि. ०८/१०/२०२४ ते १५/१०/२०२४

३.निविदा स्विकारणेचा कालावधी :- दि. ०८/१०/२०२४ ते १५/१०/२०२४

४.निविदा उघडण्याचा दिनिांक :- दि. १७/१०/२०२४

५.कामाची मुदत : ०६ महिने

६.प्राप्त झालेलया निविदेचा तपशील दि.१०/१२/२०२४ च्या तांत्रिक छाननीनुसार

| निविदा क्रमांक | कामाचे नांव | निविदा रक्कम (GST व्यतिरिक्त सुधारीत अंदाजपत्रक) | निविदा दाखल करणारे ठेकेदार | निविदे मध्ये भरलेला निविदा दर | सर्वात कमी दराची निविदा व त्यांचा दर |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | ०२ | ०३ | ०४ | ०५ | ०६ |
| ई निविदा क्रमांक १११०७४९-१ | ई निविदा क्र. १११०७४९-१ अहिल्यानगर महानगरपालिकेच्या नगररचना विभागास अभिलेख ठेवणेसाठी नगररचना ऑफिस शेजारी रूम बांधणे | **२६,३९,४१२/-** | श्री.चेतन मारूती जाधव, अहिल्यानगर | निविदा दरापेक्षा २% ज्यादा दराने | श्री.आनंद दत्तात्रय पुंड, अहिल्यानगर<br><br>निविदा दरापेक्षा १.१२०% कमी दराने |
| | | | श्री.आनंद दत्तात्रय पुंड, अहिल्यानगर | निविदा दरापेक्षा १.१२०% कमी दराने | |

वरिल तुलनात्मक तक्त्याच्या अनुषंगाने स्पर्धात्मक दृष्टया रकाना क्रमांक ५ मध्ये नमुद निविदाधारक श्री.आनंद दत्तात्रय पुंड, अहिल्यानगर यांची निविदा, निविदा दरापेक्षा १.१२०% कमी दराने आलेली असुन ती सर्वात कमी दराची आहे. निविदा अटी शर्ती नुसार शासन परिपत्रक क्र.सी.ए.टी./२०१७/प्र.क्र.०८/इ.मा-२ दि. २६ नोव्हेंबर २०१८ नुसार निविदा दरापेक्षा कमी दराची निविदा असल्याने पावती क्र. FL०४/९६०९ दि. ०६/०१/२०२५ नुसार २५४००/- रू.चा "Additional Performance Security Deposite" भरणा केलेला आहे.

तरी उक्त बाब विचारात घेउन निविदाधारक श्री.आनंद दत्तात्रय पुंड, अहिल्यानगर यांची निविदा दराच्या निविदेस मा.प्रशासक यांची मंजुरी देणेत येत आहे.

---

**निर्णय:-** महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग,शासन आदेश क्रमांकः एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.२८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

सही/-
**(मेहेर लहारे)**
प्र.नगरसचिव
अहिल्यानगर महानगरपालिका,

सही/-
**(यशवंत डांगे)**
मा.प्रशासक,
अहिल्यानगर महानगरपालिका

# अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर

## नगरसचिव विभाग

## मा.प्रशासक यांजकडील मा. स्थायी समिती विषयांबाबतचे निर्णय

**कार्यसूची क्रमांक -३२**

मा.प्रशासक ठराव क्र. ३८६ विषय क्रमांक- ३८६

दिनांक- २१/०१/२०२५ विभाग - पाणी पुरवठा

---

**विषय :-** अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील इंदिरा नगर,केडगांव,कल्याण रोड परिसर व शहर, सावेडी या ठिकाणी टँकरद्वारे पाणी पुरवठा करणे कामी प्राप्त ई निविदेबाबत

**ठराव :-** विभागाने प्रस्तावित केल्यानुसार अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीत इंदिरा नगर, केडगांव, कल्याण रोड परिसर व शहर, सावेडी या ठिकाणी टँकर्सद्वारे पाणी पुरवठा करणे या कामाची फेर ई निविदा क्र. १०८७७५५-१, दि.१९/०९२०२४ रोजी प्रसिध्द करण्यात आली होती.

या अनुषंगाने दिनांक २७/०९/२०२४ रोजी सदर निविदेचा स्क्रीन शॉट पाहिला असता त्याकरिता १)मे.दिपाली ट्रान्सपोर्ट ,अ.नगर २)मे.गाडे ट्रान्सपोर्ट, अ.नगर ३)मे.राहुरी तालुका मोटार वाहतुक सहकारी संस्था मर्या. ४) सचिन भगवानराव दाभाडे ,बीड ५) श्री गणेश सहकारी मोटार वाहतुक संस्था मर्या, अ.नगर ६)सुदर्शन मोटार सप्लायर्स,थेरगांव, पुणे अशा ०६ निविदा प्राप्त झालेल्या असल्याने सदर निविदेचा तांत्रिक लिफाफा उघडण्यात आला.

दिनांक ०५/१२/२०२४ रोजीच्या छाननी समितीच्या बैठकीत तांत्रिक कागदपत्रांची छाननी केली असता सदरहू ०६ निविदाधारकांपैकी १) )मे.राहुरी तालुका मोटार वाहतुक सहकारी संस्था मर्या.२) सचिन भगवानराव दाभाडे ,बीड ३) श्री गणेश सहकारी मोटार वाहतुक संस्था मर्या, अ.नगर यांची तांत्रिक कागदपत्रे अपूर्ण असल्याने त्यांना अपात्र ठरविण्यात आले व उर्वरित १)मे.दिपाली ट्रान्सपोर्ट ,अ.नगर २)मे.गाडे ट्रान्सपोर्ट, अ.नगर ३) सुदर्शन मोटार सप्लायर्स, थेरगांव,पुणे यांची कागदपत्रे निविदा अटी व शर्ती नुसार यथायोग्य असल्यामुळे पात्र ठरवून दि. ११/१२/२०२४ रोजी सदर निविदेचा आर्थिक लिफाफा उघडण्यात आला. प्राप्त झालेले दर खालील प्रमाणे आहेत.

| अ.नं. | निविदाधारकाचे नांव | प्रतिदिन प्रति मे.टन भाडे | प्रति किमी दर प्रति मे.टन |
|---|---|---|---|
| १ | मे.दिपाली ट्रान्सपोर्ट ,अ.नगर | रू.२४५.०० | रू.३.४० |
| २ | सुदर्शन मोटार सप्लायर्स, थेरगांव,पुण | रू.२५०.०० | रू.३.४० |
| ३ | मे.गाडे ट्रान्सपोर्ट, अ.नगर | रू.२६२.५० | रू.३.४५ |

सदर ई निविदा क्र. १०८७७५५-१ मधील उपरोक्त नमूद तीनही निविदाधारकांपैकी सर्वात कमीचे दरधारक मे.दिपाली ट्रान्सपोर्ट, अ.नगर यांचे असल्याने दिनांक ०३/०१/२०२४ रोजी वाटाघाटी करिता बोलावून अंतिम दर सादर करणे बाबत कळविले होते. तदनंतर त्यांचेकडून खालील प्रमाणे वाटाघाटी नंतरचे अंतिम दर सादर करण्यात आलेले आहेत.

| अ.नं. | निविदाधारकाचे नांव | प्रतिदिन प्रति मे.टन भाडे | प्रति किमी दर प्रति मे.टन |
|---|---|---|---|
| १ | मे.दिपाली ट्रान्सपोर्ट ,अ.नगर | रू.२२५.०० | रू.३.४० |

करिता विषयांकित कामासाठी उपरोक्त नमुद दरधारक मे.दिपाली ट्रान्सपोर्ट, अहिल्यानगर यांचेशी झालेल्या वाटाघाटी नुसार एजन्सीने सादर केलेला अंतिम दरास तसेच पुढील कार्यारंभ आदेश होईपर्यत कामास व खर्चास मा.प्रशासक यांची मंजुरी देणेत येत आहे.

---

**निर्णय:-** महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग,शासन आदेश क्रमांकः एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.२८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

सही/-
**(मेहेर लहारे)**
प्र.नगरसचिव
अहिल्यानगर महानगरपालिका,

सही/-
**(यशवंत डांगे)**
मा.प्रशासक,
अहिल्यानगर महानगरपालिका

**अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर**
**नगरसचिव विभाग**
**मा.प्रशासक यांजकडील मा. स्थायी समिती विषयांबाबतचे निर्णय**

**कार्यसूची क्रमांक -३२**

मा.प्रशासक ठराव क्र. ३८७ विषय क्रमांक- ३८७
दिनांक- २१/०१/२०२५ विभाग - अर्थ विभाग

---

**विषय :-** अहिल्यानगर महानगरपालिका सन २०२४-२०२५ पुर्ननियोजन अंदाजपत्रका बाबत

**ठराव :-** विभागाने प्रस्तावित केल्यानुसार, अहिल्यानगर महानगरपालिकेच्या सन २०२४-२०२५ चे मंजूर अंदाजपत्रकातील खर्चाचे अनुदान वाढ /घट करणे बाबत घनकचरा विभागाकडून प्रस्ताव प्राप्त झालेला आहे. सन २०२४-२०२५ चे पुनर्विनियोजन अंदाजपत्रकाबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम १०३ व अनुसुची "ड" मधील प्रकरण ७ मधील २(२) (अ) (ब) (क) अन्वये रकमा कमी करणे किंवा बदली करणे नुसार प्रस्ताव ठेवण्यात येत आहे.

उपरोक्त नियमानुसार स्थायी समिती सरकारी वर्षात कोणत्याही वेळी -

(अ) अर्थ संकल्पीय अनुदानाची रक्कम कमी करता येईल.

(ब) अर्थ संकल्पीय अनुदानातील कोणतीही रक्कम एका गौण शीषार्तून दुस-या गौण शीर्षात किंवा एका गौण शीर्षा खालील दुय्यक शीर्षातून दुस-या गौण शीर्षा खालील दुय्यम शीर्षात बदली करण्यास मंजूरी देता येईल.

(क) गौण शीर्षाखालील पाच हजार रूपयां पेक्षा अधिक असेल अशी कोणतीही रक्कम, एका दुय्यम शीर्षातून दुस-या दुय्यम शीर्षात किंवा एका प्राथमिक घटकातून दुस-या प्राथमिक घटकात बदली करण्यास मंजूरी देता येईल अशी तरतूद आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम १०३ नुसार "रकमा कमी करणे किंवा बदली करणे " या तरतूदीनुसार "कोणत्याही अर्थ संकल्पीय शिर्षात कमी करावयाच्या रकमा नियमानुसार कमी केल्या पाहिजेत आणि एका अर्थ संकल्पीय शिर्षातून दुस-या अर्थ संकल्पीय शिर्षातर्गत बदली करावयाच्या रकमा नियमानुसार बदली केल्या पाहिजेत " अशी तरतूद असल्याने प्रकरण ७ मधील २(२) मधील (अ) (ब) (क) नुसार सन २०२४-२०२५ चे पुनर्विनियोजिनाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

तरी बांधकाम विभागाने दिलेल्या प्रस्तावात रू. २००००००/- चे पुनर्विनियोजन सादर केले. तरी सोबत जोडलेला रू. २००००००/- पुनर्विनियोजन होवू शकते

महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता १९७१ चा नमुना क्रमांक १० नियम ३०(३ )पहा
अहिल्यानगर महानगरपालिका अहिल्यानगर
सन २०२४-२०२५ चे सादर केलेले पुनर्विनियोजनाचे विवरणपत्र

| | या शिर्षातून | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | प्रधान , गौण व तपशिलवार शीर्ष | बांधकाम विषयक सेवा वगैरे | मुळ अनुदान (सन २०२४-२०२५) | दि.०२ जानेवारी अखेरचा खर्च | उपलब्ध शिल्लक (प्रस्तावित कमी करावयाची रक्कम) | (४-६) सुधारित तरतूद | अभिप्राय |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | बांधकाम विभाग | १) अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक पोटी जमा होणा-या रकमेतून कामे | १४८०००००० | १३४९९०८७३ | २०००००० | १४६०००००० | बांधकाम विभागाचा प्रस्ताव |
| | | | | | | | |
| | | **एकूण रक्कम (तरतूद)** | | | **२००००००** | | |

| | हया शिर्षात | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | प्रधान , गौण व तपशिल वार शीर्ष | बांधकाम विषयक सेवा वगैरे | मुळ अनुदान (सन २०२४-२०२५) | दि.०२ जानेवारी २०२४ अखेरचा खर्च | प्रस्तावित वाढीची रक्कम | अभिप्राय (११-१३) सुधारित तरतूद | अभिप्राय |
| ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ |
| १ | बांधकाम विभाग | १) बांधकाम परवानगी अंतर्गत सुधारणा | ५००००००० | ४९७४६२५ | २०००००० | ७०००००० | बांधकाम विभागाचा प्रस्ताव |
| | | | | | | | |
| | | **एकूण रक्कम (तरतूद)** | | | **२००००००** | | |

सन २०२४-२०२५ चे पुनर्विनियोजन करणेस मा.प्रशासक यांची शिफारस करण्यात येत आहे. तसेच अंतिम मंजूरी करिता मा.महासभेपुढे सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

---

**निर्णयः-** महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग,शासन आदेश क्रमांकः एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.२८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

सही/-
**(मेहेर लहारे)**
प्र.नगरसचिव
अहिल्यानगर महानगरपालिका,

सही/-
**(यशवंत डांगे)**
मा.प्रशासक,
अहिल्यानगर महानगरपालिका

**अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर**

**नगरसचिव विभाग**

**मा.प्रशासक यांजकडील मा. स्थायी समिती विषयांबाबतचे निर्णय**

**कार्यसूची क्रमांक -३२**

मा.प्रशासक ठराव क्र. ३८८ — विषय क्रमांक- ३८८

दिनांक- २१/०१/२०२५ — विभाग - घनकचरा व्यवस्थापन

---

**विषय :-** अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीमधील विविध ठिकाणी व शासकीय इमारतीवर वॉलपेंटद्वारे सुविचार घोषवाक्य लिहून घेणे व स्वच्छ सर्वेक्षण कामाकरिता विविध फ्लेक्स, बॅनर छपाई करणेकामी ई निविदेबाबत

**ठराव :-** विभागाने प्रस्तावित केल्यानुसार अहमदनगर महानगरपालिका हद्दीमध्ये स्वच्छ सर्वेक्षण अंतर्गत नागरिकांमध्ये जनजागृती करणे कामी संदर्भाकीत ई-निविदा प्रसिध्द करण्यात आलेली असून सदर निविदेमध्ये एकूण ६ संस्थांनी सहभाग नोंदविलेला असून त्याचे प्राप्त तांत्रिक लिफाफ्यातील कागदपत्रांची छानणी केली असता तीन संस्था पात्र ठरल्या असून पात्र संस्थांचे दराचे लिफाफे उघडले असता मे सहकार्य सप्लायर्स ॲण्ड अर्थ मुव्हर्स या संस्थेचे दर लघुत्तम प्राप्त असून दरांचा तक्ता सोबत जोडले प्रमाणे आहे. मे सहकार्य सप्लायर्स ॲण्ड अर्थ मुव्हर्स, अहमदनगर या संस्थेचे दर सर्वात लघुत्तम आहेत. प्राप्त दरांबाबत वाटाघाटी केली असता खालील तक्त्यामध्ये दर्शविल्यानुसार

| संस्थेचे नांव | अ.क्र. व कामाचा तपशिल | निविदेमधील प्राप्त दर | वाटाघाटी अंती मंजूर दर |
|---|---|---|---|
| मे.सहकार्य सप्लायर्स ॲण्ड अर्थ मुव्हर्स | १) लोखंडी फ्रेम सहित होर्डीग प्रति स्क्वेअर फुट | रू.६५/- | रू.५५/- |
| | २)बॅनर प्रति स्क्वेअर फुट | रू.४५/- | रू.३५/- |
| | ३) भिंतीवर वॉलपेंटद्वारे सुविचार,घोषवाक्य लिहिणे प्रति स्क्वेअर फुट दर | रू.७५/- | रू.६०/- |
| | ४)वाहनांवर ऑईलपेंटद्वारे लिहिणे प्रति स्क्वेअर फुट | रू.१३०/- | रू.१००/- |
| | ५)प्रमाणपत्र छपाई करून पुरवठा करणे प्रति नग A४ साईजमध्ये किमान दोन ते तीन रंगामध्ये प्रति नग रक्कम | रू.५०/- | रू.२०/- |
| | ६) स्टीकर्स प्रति इंच किमान दोन ते तीन रंगामध्ये प्रति इंच दर रक्कम | रू.०.४५ पैसे | रू.०.४० पैसे |
| | ७) आयकार्ड तयार करून पुरवठा करणेबाबत प्रति नग दर रक्कम | रू.२२५/- | रू.५०/- |
| | ८) सन्मानचिन्ह तयार करून पुरवठा करणे बाबत प्रति नग दर रक्कम | रू.४५०/- | रू.२५०/- |
| | ९)पॉम्लेट छपाई १X४ साईजचे चार रंगामध्ये पुरवठा करणे बाबत प्रति १०० प्रमाणे दर रक्कम | रू.५००/- | रू.५००/- |

तक्त्यानुसार वाटाघाटी अंती दर मंजूर असले बाबत मे.सहकार्य सप्लायर्स ॲण्ड अर्थ मुव्हर्स ,अहमदनगर या संस्थेने सदर ई निविदा ही एक वर्ष कालावधीकरिता राबविण्यात आलेली आहे. सदर ई निविदेमधील लघुत्तम असणा-या मे.सहकार्य सप्लायर्स ॲण्ड मुव्हर्स संस्थेचे दरास तसेच मे.सहकार्य सप्लायर्स ॲण्ड अर्थ मुव्हर्स यांनी पुढील तीन वर्षाकरिता काम करणेस तयार असलेबाबत पत्र दिलेले आहे. मे.सहकार्य सप्लायर्स ॲण्ड अर्थ मुव्हर्स या संस्थेचे दर स्पर्धात्मदृष्टया अत्यल्प दर असल्याने या अत्यल्प दरानुसार मे.सहकार्य सप्लायर्स ॲण्ड अर्थ मुव्हर्स ,अहमदनगर या संस्थेस पुढील एक वर्षा करीता म्हणजेच सन २०२५-२०२६ वर्षाकरिता काम देण्यास मा.प्रशासक यांची मंजुरी देणेत येत आहे.

---

**निर्णयः-** महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग,शासन आदेश क्रमांकः एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.२८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

| | |
|---|---|
| सही/- | सही/- |
| **(मेहेर लहारे)** | **(यशवंत डांगे)** |
| प्र.नगरसचिव | मा.प्रशासक, |
| अहिल्यानगर महानगरपालिका, | अहिल्यानगर महानगरपालिका |